नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०६/२०२५ (रविवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत महाराष्ट्र विधी विश्व विदयालय, वारंगा येथील प्रशासकीय इमारतीचे लोकार्पन सोहळा बंदोबस्त यशस्वीपणे पार पडल्याबाबत

आज दिनांक २९/०६/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन बुंटीबोरी हद्‌दीतील महाराष्ट्र विधी विश्व विदयालय, वारंगा येथील प्रशासकीय इमारतीचे लोकार्पन सोहळा असल्याने **मा.श्री. भुषण गवई, सरन्यायाधिश सर्वोच्च न्यायालय, मुंबई, मा.ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा.श्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री, भारत सरकार, मा.श्री. दिपनकर दत्ता, न्यायाधिश, सर्वोच्च न्यायालय, मा.श्री. प्रसन्ना वराले, न्यायाधिश सर्वोच्च न्यायालय, मा.श्री अतुल चांदुरकर, न्यायाधिश, सर्वोच्च न्यायालय, मा. श्री आलोक आराध्ये, मुख्य न्यायाधिश, मा. श्री नितीन सांबरे, न्यायधिश, उच्च न्यायालय, मा.श्री. अणिल किलोर, न्यायाधिश, उच्च न्यायालय, मा.श्री.विकास सिरपुरकर, न्यायाधिश, ॲड तुषार मेहता, डॉ बिजेंद्र सराफ, प्रोफेसर डॉ. विजेंदर कुमार, डॉ. रागिनी खुबाळकर या मान्यवरांची उपस्थिती होती.** मान्यवरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदोबस्ताचे योग्य व काटेकोर नियोजन आवश्यक होते त्याकरीता सर्व नियमावली व निर्देशानुसार नियोजन करून त्यांची पुर्णता अंमलबजावणी करून नागपुर ग्रामीण जिल्हयात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता. जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनात सदर बंदोबस्ताची योग्य आखणी करून कॅन्वॉय, रोड बंदोबस्त, कार्यक्रम स्थळ बंदोबस्त, पार्कीग बंदोबस्त असा बंदोबस्त आराखडा तयार केला होता. **सदर बंदोबस्त महत्वाचा असल्याने दिनांक २८/०६/२०२५ रोंजी बंदोबस्ताबाबत रंगित तालीम सुध्दा घेण्यात आली होती.मा.श्री. भुषण गवई, सरन्यायाधिश सर्वोच्च न्यायालय मुंबई यांना नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.**

सदर बंदोबस्तात एकुण १ अपर पोलीस अधिक्षक, २ उपविभागिय पोलीस अधिकारी, २३ पोलीस निरीक्षक/ सपोनि /पोउपनि, १२६ पोलीस अंमलदार असे अधिकारी/अंमलदार यांनी काटेकोरपणे कर्तव्य पार पाडल्याने सदर बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ८ गुन्हे नोंद एकुण १२,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २८/०६/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १२,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी क्रं १.** बादल जवाहरलाल जैस्वाल, वय ३९ वर्षे ,रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपुर **आणि क्रं २.** महीला आरोपी यांचेवर, **पोलीस स्टेशन कळमेशवर** अंतर्गत आरोपी क्रं १ देवानंद गजानन सिर्सिकर, वय ५२ वर्ष, रा. उबाळी , आरोपी क्रं २. मधु मैतर मरकाम, वय ५० वर्षे, रा. डोंगरे ले आउट, एमआयडीसी कळमेश्वर आणि महीला आरोपी यांचे वर, **पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत आरोपी रामकृष्णा तूळशीराम धावडे, वय ६१ वर्षे, रा. रोहना, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर, **पोलीस स्टेशन काटोल** येथे विरेन्द्र पांडुरंगजी पाटील, वय ४५ वर्ष, रा. लिंगा सावळी, ता. काटोल, जि. नागपुर याचेवर, **पोलीस स्टेशन भिवापुर,** संजय पंढरी वारजुरकर, वय ३४ वर्ष, रा. कारगाव, ता. भिवापुर, जि. नागपुर **याचेवर** अशा **एकुण ८ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ८ गुन्हे दाखल केले आहे.**

# अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन कुही :—** पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा खरबी शेतशिवार येथ दिनांक २८/६/२५ चे ०७/०० वा ते०९/०० वा. रोजी मृतक नामे पुष्पा सखाराम वैद्य, वय ५० वर्षे, रा. खरबी, ता. कुही जि. नागपुर, या शेतामध्ये विजेंच्या पोल जवळील कचरा कापत असतांना हातातील विळा पोलला लागलेल्या ताराला लागल्याने करंट लागुन त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी पोलीस कुही येथे अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**